पुण्य नगरी

रविवार, ११ मार्च २०१२

पुण्य नगरी

रविवार, ११ मार्च २०१२

just औरंगाबाद

# 'आझाद' संस्थेच्या वतीने युवकांचा सत्कार

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

आझाद अली शिक्षण संस्थेच्या वतीने अल्पसंख्याक समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या युवकांचा सत्कार करण्यात आला. उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून माजी महापौर मनमोहन सिंग ओबेरॉय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष मुस्ताक अहेमद, संस्थेच्या अध्यक्षा सुरैया खान, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साजिद पाशा आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बी. ई. सिव्हिलमध्ये स्वर्णपद विजेते व राज्यपालांच्या हस्ते सन्मानित रियाज बिसमिल्ला खान, हज यात्रेकरुंची सेवा करणारे मुजफ्फर बाऊद्दिन सिद्दिकी तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणोरे, मिर्झा अन्वर बेग आदींचा सत्कार करण्यात आला. साजिद पाशा यांनी सत्कारमूर्तिंचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरिफ शेख तर आभार मुकिम पटेल यांनी मानले.